**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक १३ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **पत हमी योजनेमुळे भारत एक स्वावलंबी राष्ट्र बनण्यास मदत होईल असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन.**
2. **त्र्यंबकेश्वर इथं २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या विकास कामांचा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रारंभ.**
3. **राज्यस्तरीय जनजाती गौरव दिवस दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर दरम्यान नागपुरात साजरा होणार असल्याची मंत्री अशोक उईके यांची माहिती.**
4. **वर्धा जिल्हा 'प्रेस्बायोपिया' मुक्त करण्यासाठी राज्य शासनाचा नज फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार.**

---

पत हमी

केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजूर केलेल्या निर्यातदारांसाठीच्या पत हमी योजनेमुळे स्पर्धात्मकता वाढेल, व्यवसाय सुलभ होईल आणि भारत एक स्वावलंबी राष्ट्र बनायला मदत होईल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाज माध्यमावरल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. यात त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयांचं कौतुक केलं. केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक काल नवी दिल्लीत मोदींच्या अध्यक्षतेखाली झाली. यात निर्यातदारांसाठी नवीन पत हमी योजनेला मंजुरी देण्यात आली. या योजने अंतर्गत २० हजार कोटी रुपयांपर्यंतचं अतिरिक्त कर्ज दिलं जाईल, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर वार्ताहरांना सांगितलं. याशिवाय सिझियम, ग्रेफाइट, रुबिडियम आणि झिरकोनियम या खनिजांसाठी रॉयल्टी दरांचं सुसूत्रीकरण करणं तसंच, २५ हजार ६० कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाच्या निर्यात प्रोत्साहन अभियानाला मंजुरी देण्यात आली. याबद्दल अश्विनी वैष्णव म्हणाले. -

***(होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव)***

***एक्सपोर्ट प्रमोशन मिशन स्टार्ट किया गया है २५ हजार ६० करोड रुपये का इसका आउटलेट है, ६ साल की इसकी अवधि है और इसमें बहुत ही कॉम्प्रीहेन्सिव तरीके से पूरे कंप्लीट एक्सपोर्ट की इको सिस्टम को सपोर्ट करने का इसमें डिसीजन लिया***

***प्रायोरिटी इन सेक्टर्स को दी जाएगी, जिनके ऊपर अभी एक ऐडवर्ड्स इम्पैक्ट है जैसे टेक्सटाइल है, लेदर है, जेम्स ज्वेलरी है इंजीनियरिंग गुड्स और मरीन प्रोडक्ट्स.***

दिल्लीमधल्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांना मंत्रिमंडळ बैठकीत श्रद्धांजली वाहण्यात आली. सरकार कोणत्याही प्रकारचा दहशतवाद सहन करणार नाही, असं वैष्णव यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

---------------------------------------------

सिंहस्थ कुंभ

नाशिकमध्ये त्र्यंबकेश्वर इथे २०२७मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ६ हजार कोटी रुपयांच्या विकास कामांचा प्रारंभ आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते  नाशिक इथे एका जाहीर कार्यक्रमात दूरस्थ पद्धतीने झाला. या विकास कामांसंबंधीची एक चित्रफितही यावेळी प्रदर्शित करण्यात आली. यासोबत त्यांनी पंचवटीतल्या रामकुंड परिसरात सुरू असलेल्या रामकाल पथ आणि अन्य कामांची पाहणीही केली. या कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे तसंच अन्य मान्यवर उपस्थित होते.

---------------------------------------------

दिल्ली स्फोट

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवणारी व्यक्ती, डॉक्टर उमर उन नबी असल्याचं, डीएनए चाचणीतून स्पष्ट झालं आहे. स्फोटानंतर त्याचा पाय स्टीअरिंग व्हील आणि ॲक्सिलरेटरमध्ये अडकला होता. त्याचा डीएनए नमुना त्याच्या आईशी जुळला असल्याची माहिती, दिल्ली पोलिसांनी दिली. दरम्यान, दिल्ली मेट्रोचं लाल किल्ला स्थानक सुरक्षेच्या कारणास्तव पुढची सूचना मिळेपर्यंत बंद राहील, असं मेट्रो रेल कॉर्पोरेशनने कळवलं आहे. दरम्यान, जम्मू काश्मीरमधे जैश-ए-मुहम्मद या प्रतिबंधित संघटनेशी संबंधित १३ ठिकाणांवर आज छापे टाकण्यात आले.

---------------------------------------------

पोस्टर वाद

अमरावती शहरात लागलेल्या 'विचारा इस्लाम' या पोस्टरची गंभीर दखल, महसूलमंत्री आणि अमरावतीचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतली असून, पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांना, दोषींवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. अमरावतीमध्ये काही महिन्यांपूर्वी 'आय लव मोहम्मद' अशा आशयाचे पोस्टर लावण्यात आले होते. त्यानंतर आता 'विचारा इस्लाम' या आशयाचे पोस्टर

दिसत आहेत. हे पोस्टर लावण्यामागचा हेतू तपासावा, तसंच अमरावतीचे सामाजिक वातावरण बिघडवण्याचे प्रयत्न करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश ,बावनकुळे यांनी दिले आहे.

---------------------------------------------

वसंतदादा पाटील जयंती

माजी मुख्यमंत्री आणि सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. विधानपरिषदेच्या उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी, विधान भवन परिसरातल्या वसंतदादा यांच्या पुतळयाला अभिवादन केलं. विधानमंडळ सचिवालयातले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनीही वसंतदादा पाटील यांच्या पुतळयाला अभिवादन केलं.

---------------------------------------------

ट्रंपेट

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या निवडणूक चिन्हाशी साधर्म्य सांगणारं ,ट्रंपेट हे चिन्ह, निवडणूक आयोगाने यादीतून बाद केलं आहे. या चिन्हाला मराठीत तुतारी असं नाव दिलं होतं. अनेक अपक्षांनी त्यावर निवडणूक लढवली होती. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला, तुतारी फुंकणारा माणूस हे चिन्ह मिळाल्यावर, ट्रंपेट चिन्हामुळे मतदारांचा गोंधळ होऊन आपली मतं अपक्षांना मिळाल्याचा दावा पक्षाने केला होता. आता निवडणूक आयोगाने हे चिन्ह यादीतून हटवलं आहे.

---------------------------------------------

जनजाती गौरव वर्ष

२०२४-२०२५ हे वर्ष धरतीआबा भगवान बिरसा मुंडा यांचं दीडशेवं जयंती वर्ष आहे. हे वर्ष भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने जनजाती गौरव वर्ष म्हणून साजरं करण्यात येत आहे. त्यानिमित्त आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागपुरातील मानकापूर स्टेडिअम इथं दिनांक १५,१६,१७ नोव्हेंबर रोजी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असल्याची माहिती आदिवासी विकास विभाग मंत्री डॉ.अशोक उइके यांनी नागपुरात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

***(होल्ड बाईट - मंत्री डा॑अशोक उइके - २५ सेकंद)***

***राज्यस्तरीय जनजाती गौरव दिवस आपण नागपूर मध्ये साजरा करत आहोत दिनांक १५ तारखेला सकाळी एक युवकांची आणि सर्व समाज घटकांची आम्ही मिरवणूक काढणार आहे. मिरवणुकीच्या माध्यमातून भगवान बिरसा मुंडाच्या***

***स्मुर्तीस अभिवादन करणार आहेत, १५ तारखेला ११ वाजता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वात भगवान बिरसा मुंडा यांचं जनजातीय गौरव दिवस साजरा करण्याचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.***

या तीन दिवसीय उत्सवात आदिवासी जनजीवन, साहित्य आणि कलाकृतींचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे.

---------------------------------------------

आंतरराष्ट्रीय व्यापार मेळा

भारत आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचं उद्घाटन उद्या नवी दिल्लीत होणार असून, यातल्या महाराष्ट्राच्या दालनाचं उद्घाटन उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळानं उभारलेल्या या दालनात महिला बचत गट, महिला उद्योजकांच्या दालनांसह एकंदर ६० दालनं असतील.

---------------------------------------------

वंदे मातरम

देशात सर्वत्र आपले राष्ट्रीय गीत, 'वंदे मातरमचा' दीडशेव्वा वर्धापन दिन साजरा करण्यात येत आहे. हे गीत भारतीयांच्या पिढ्यांना एकत्र आणण्यास आणि राष्ट्रभक्तीच्या भावनेचा उत्सव साजरा करण्यास प्रेरित करते. ऐकुया विषयी तपशीलवार वृत्त -

***(व्हॉइस कास्ट - हेमांगी कुलकर्णी)***

***वंदेमातरम'चा सामर्थ्यशाली स्वर भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या रंगांत आणि प्रतीकांतही गुंजला. हा घोष प्रारंभीच्या अनेक ध्वजांवर दिसून आला. वर्ष १९०४ मध्ये भगिनी निवेदितांनी बंगाली भाषेत 'बंदे मातरम' लिहिलेला वज्रध्वज (Vajra Flag) तयार केला. हा ध्वज प्रारंभी ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षाचे प्रतीक बनला. बंगालच्या फाळणीच्या काळात तो सभांमध्ये, मोर्चांमध्ये फडकताना दिसला आणि नंतर १९०६ मध्ये कलकत्ता काँग्रेस अधिवेशनात अभिमानाने झळकवण्यात आला.७ ऑगस्ट १९०६ रोजी कलकत्त्यातील पारशीबागान इथं पहिला राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. हा ध्वज सचिंद्रनाथ बोस आणि सुकुमार मित्र यांनी 'अनुशीलन समितीच्या' सहाय्याने तयार केला होता. हा ध्वज तीन आडव्या पट्ट्यांचा होता – वर हिरवा, मध्येपिवळा आणि खाली लाल. पिवळ्या पट्टीवर देवनागरी लिपीत 'वंदे मातरम' अस लिहिल होत. कलकत्ता ध्वजाला 'बंदे मातरम ध्वज' म्हणूनही ओळखल जात. या ध्वजात नंतर अनेक बदल होत गेले. मात्र प्रत्येक वेळीत्यावर 'वंदे मातरम' लिहिलेलं असायचं . हाध्वज भारताच्या एकतेचं आणि आशेचं सशक्त प्रतीक***

***बनला.याच काळात, १९०६ मध्ये बिपिनचंद्र पाल यांनी 'बंदे मातरम'नावाचं दैनिक सुरू केलं आणि अरबिंदो यांना त्यात सहभागी होण्याचं आमंत्रण दिलं. त्यांच्या लेखणीतून'वंदे मातरम'ही केवळ एक घोषणा न राहता ती एक विचारप्रवाह, एक धैर्याची चळवळ आणि राष्ट्रीय अभिमानाचे जाज्वल्य प्रतीक बनली. (आकाशवाणीसाठी वृत्त विभागातून मी हेमांगी कुळकर्णी)***

दरम्यान 'वंदे मातरम' या राष्ट्रीय गीताला 150 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त भंडारा जिल्हा पोलिस मुख्यालयातील चैतन्य मैदानावर काल सामूहिक गायन कार्यक्रम संपन्न झालं.जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांसह शालेय विद्यार्थी आणि विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

---------------------------------------------

'प्रेस्बायोपिया'

वृद्धापकाळातील दृष्टीदोष 'प्रेस्बायोपिया'पासून वर्धा जिल्ह्याला मुक्त करण्यासाठी राज्य शासनानं नज फाऊंडेशनसोबत सामंजस्य करार केला आहे. या अंतर्गत, जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकाची तपासणी करून आजारग्रस्तांना विनामूल्य चश्मे वितरित केले जातील. या प्रायोगिक मोहिमेसाठी सुमारे 4 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, डिसेंबरमध्ये कारंजा तालुक्यातून मोहिमेची सुरुवात होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाच कौतुक करत ,वर्ध्याला 'मॉडेल जिल्हा' बनविण्याच आश्वासन दिल.

---------------------------------------------

क्रिकेट

दक्षिण आफ्रिकेचा क्रिकेट संघ भारताच्या दौऱ्यावर आला आहे. या दौऱ्यात दोन कसोटी सामने होणार असून, पहिला सामना उद्या कोलकात्याच्या ईडन गार्डन्स मैदानावर सुरु होईल.

---------------------------------------------

हवामान

हवामान! सलग दुसऱ्या दिवशी विदर्भातील गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी किमान तापमान नोंदवण्यात आलं आहे. गोंदिया जिल्ह्यात आज १० पूर्णांक ८ अंश सेल्सियस इतकं किमान तापमान नोंदवण्यात आलं. गोंदिया पाठोपाठ, यवतमाळ इथं ११ पूर्णांक ६ तर वाशीम मध्ये 11 पूर्णांक 8 आणि नागपूरात बारा पूर्णांक पाच दशांश अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली.

---------------------------------------------